स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

मानव्य विद्याशाखे अंतर्गत लोकप्रशासन विषयातील पीएच.डी. संशोधन कार्यासाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधनाचा विषय

शालेय शिक्षणातील मध्यान्ह भोजन योजना प्रशासन व अंमलबजावणी एक चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा

संशोधकाचे नाव

पार्वती दिगांबरराव वासरे

एम.ए. (लोकप्रशासन) बी.एड्, एम. फिल

मार्गदर्शकाचे नाव

डॉ. संतराम प्रभाकर मुंडे

लोकप्रशासन विभाग प्रमुख

संजिवनी महाविद्यालय, चापोली

ता. चाकूर जि. लातूर

प्रस्तावना :

प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षण पद्धतीतील महत्वाचा दुवा समजला जातो. कारण ते पायाभूत शिक्षण आहे. प्राथमिक शिक्षणाची उद्दिष्टये जबाबदार नागरीक तयार करणे, भाषिक व गणन कौशल्य निर्माण करणे, योग्य सवयी व वृत्ती यांचा परिपोष करणे असे सांगितले जातात.

एकोणविसाव्या शतकातील प्राथमिक शिक्षणाची ध्येये लेखन, वाचन व गणित या तीन विषयाचे प्राथमिक स्वरूपाचे ज्ञान देणे हे होते. परंतु समाजाच्या शिक्षणाबद्दलच्या अपेक्षाही वाढत गेले आहेत. त्यामुळे प्राथमिक शिक्षणात मुलांचे शारिरीक आणि मानसिक आरोग्य सुयोग्य अभिरूची सामाजिक समायोजन, भावनिक समतोल उच्च प्रकारची बौध्दीक क्षमता आणि लोकशाही जिवनासाठी आवश्यक असणाऱ्या सवयी आणि वृत्ती यांच्या विकासावर अधिकाधिक भर दिला जात आहे. अशा परिस्थितीत प्राथमिक शिक्षणासाठी पोषक वातावरण आपण विद्यार्थ्यांना वेगवेगळया सोयी सुविधा पुरवून निर्माण करता येते. त्यातील एक सोय म्हणजे 'मध्यान्ह भोजन: योजना होय'

योजना ही कितीही चांगली असली तरी प्रशासकीय अधिकारी व कर्मचा-याद्वारेच राबवली जाते. 'मध्यान्ह भोजन: योजना' राबविण्यासाठी अनेक अधिकारी व कर्मचारी लागतात. जसे केंद्रामध्ये शिक्षण मंत्रालय, राज्य स्तरावर मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री, शिक्षण मंत्री, सचिव, जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तसेच तालुका स्तरावर गटविकास अधिकारी, गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षण मध्यान्ह भोजन बनविणारे इत्यादी कर्मचाऱ्यांची आवश्यकता असते. हे अधिकारी कर्मचारी ही मध्यान्ह भोजन योजना योग्य प्रकारे राबवित आहेत का ?

शासनाने सुरू केलेल्या विविध योजनापैकी शालेय शिक्षणातील मध्यान्ह भोजन योजना ही विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढावी व सार्वत्रिकीकरणातील गळतीची समस्या दूर व्हावी यासाठी प्रामुख्याने केलेली योजना आहे. ज्याद्वारे विद्यार्थ्यांना सकस आहार दिला जातो.

प्राथमिक शिक्षण हे व्यक्तीच्या जिवनातील महत्वाचा टप्पा आहे. हे शिक्षण प्रत्येक व्यक्तीला मिळावे यासाठी प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यात आले. सार्वत्रिकीकरणात अनेक अडचणी निर्माण झाल्या

आहेत.या अडचणी दूर करण्यासाठी शासनाने विविध योजना राबविल्या आहेत. त्यापैकीच शालेय शिक्षणातील मध्यान्ह भोजना योजना ही आहे. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणातील प्रमुख समसया म्हणजे गळतीची समस्या होय. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी आणि गळती थांबविण्यासाठी राज्यामध्ये 22 नोव्हेंबर 1995 पासून इयत्ता 1 ली ते 5 वीच्या विद्यार्थ्यांसाठी केंद्र पुरस्कृत शालेय शिक्षणातील मध्यान्ह भोजन योजना सूरू करण्यात आली.

2008 पासून वर्ग 6 ते 8 करीता उच्च प्राथमिक स्तरांच्या लाभार्थ्यांसाठी सुधारित आदेशानुसार योजना सुधारित आदेशान्वये राबविण्यात येत आहे. या संबंधी उच्च प्राथमिक स्तराबाबतही संशोधन होणे आवश्यक आहे. या योजनेची अंमलबजावणी उच्च प्राथमिक शाळेत होत असतांना अनेक समस्या निर्माण होतात. या योजनेची अंमलबजावणी करतांना मुख्याध्यापकांना आपल्या शाळेतील विद्यार्थी, पालक, शिक्षक शालेय शिक्षणातील मध्यान्ह भोजन योजनातील कर्मचारी व प्रशासन प्रक्रिया यासर्व घटकांना सोबत घेऊनच या योजनाची अंमलबजावणी करावी लागते. ती करताना अनेक समस्या निर्माण होतात. संशोधक स्वत: विविध शालेय योजनाचे निरीक्षण करतेवेळी असे निदर्शनास आले की, शालेय शिक्षणातील मध्यान्ह भोजन योजनेचा वाटा ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने महत्वाचा आहे. उद्दिष्टये प्राप्त करण्यासाठी प्रस्तुत योजनेची अंमलबजावणी करतांना येणाऱ्या अडचणी व त्यावर विशिष्ट चौकटीत राहून परिसराचा व स्थानिक परिस्थितीचा विचार करून उपाय योजना केल्यास योजना प्रभावीपणे राबविण्यास मदत होईल. व सखोल अभ्यासक करून काही सृजनशील नवनवीन कल्पनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे. महत्वपूर्ण ठरणार असल्याचे निदर्शनास आले. या समस्यांचा शोध घेऊन परिपुर्ती करण्याच्या दृष्टीने उच्च प्राथमिक स्तरावर राबविल्या जाणाऱ्या शालेय शिक्षणातील मध्यान्ह भोजन योजनेबाबत संशोधकाने प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

2) <u>संशोधनाची गरज / आवश्यकता :</u>

शाळेत दिला जाणारा शालेय शिक्षणातील मध्यान्ह भोजन हे योग्य मिळतो किंवा त्यात काही अडचणी येतात हे संशोधकाला या अभ्यासातून कळेल. म्हणून प्रस्तुत विषयाची संशोधानासी निवड केली. शालेय शिक्षणातील मध्यान्ह भोजन योजना 1995 मध्ये अस्तित्वात आले इतर विषयात ज्या प्रमाणात संशोधने

झालेली आहेत. तुलनात्मकदृष्टया प्रस्तुत विषयावर संशोधनाचे प्रमाण अल्प स्वरूपाचे आहे. झालेली संशोधने ही फक्त प्राथमिक इयत्ता 1 ली ते 5 वी स्तरावरील असल्याचे निदर्शनास येते. प्राथमिक स्तरासोबतच उच्च प्राथमिक इयत्ता 6 ते 8 स्तरालाही प्रस्तुत योजना टप्या-टप्याने लागू केलेली आहे. व उच्च प्राथ्मिक स्तर हा अत्यंत महत्वपूर्ण असलेला गट आहे. ज्यामध्ये सामान्यपणे 10 ते 14 वयोगटातील मुला-मुलींचा प्रामुख्याने समावेश होतो. म्हणून संशोधकाने ही एक ज्वलंत समस्या समजून त्यावर संशोधन करण्याचे ठरविले आहे.

3) **संशोधनाचे महत्व :**

विद्यार्थ्यांना शालेय प्रवाहात आणण्यासाठी शासनाकडून शालेय स्तरावर ज्या अनेक योजना राबविल्या जात आहेत.त्यातील एक मुख्य योजना म्हणजे मध्यान्ह भोजन योजना होय. मात्र ज्या हेतूसाठी मध्यान्ह भोजन योजना सुरू करण्यात आली. शाळेत तो हेतू किती प्रमाणात साध्य झाला आहे. हे पाहणे व अडचणीचा विचार करून शिफारशी करणे अथवा त्रुटी मिळाल्यास सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविणे संशोधकाला महत्वाचे वाटले. मध्यान्ह भोजन योजनांचा सकारात्मक परिणाम झाला असल्याचे संशोधकाला वाटत असले तरीही एकूणच योजनेचा विचार करून उच्च प्राथमिक स्तरावर अंमलबजावणी करतांना त्रुटी राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी प्रत्यक्ष योजनेची अंमलबजावणी करणाऱ्याकडून अधिक चांगली माहिती मिळू शकते. म्हणून या योजनेच्या अडचणींचा अभ्यास भविष्यकाळात उपक्रमांना मार्गदर्शक ठरेल याबद्दल संशोधकाला विश्वास वाटतो आणि म्हणूनच शालेय उच्च प्राथमिक स्तरावरील महत्वाच्या विषयावर संशोधकाने संशोधन करणार आहे.

4) **संशोधनाची उद्दिष्टये :**

1. मध्यान्ह भोजन योजनेचा प्रशासकीय व अंमलबजावणी यंत्रणेचा अभ्यास करणे.
2. मध्यान्ह भोजन योजनेचा शालेय उपस्थितीवर होणाऱ्या परिणामांचा शोध घेणे.
3. मध्यान्ह भोजन योजनेची अंमलबजावणी करतांना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.
4. मध्यान्ह भोजन योजनेच्या गुणवत्ता वाढीसाठी उपाय योजना सुचविणे.
5. मध्यान्ह भोजन योजना राबवितांना मुख्याध्यापकांना येणाऱ्या समस्यांचे अध्ययन करणे.

6. मध्यान्ह भोजन योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शाळेतील व्यवस्थापन समितीच्या भूमिकेचे अध्ययन करणे.

5) <u>संशोधनाची गृहितके :</u>

01. मध्यान्ह भोजन योजनेचा प्रशासकीय व अंमलबजावणी यंत्रणा व्यवस्थीतरित्या कार्य करते.

02. मध्यान्ह भोजन योजनेच्या गुणवत्ता वाढीसाठी विविध सृजनशील उपाययोजना राबविल्या जातात.

03. मध्यान्ह भोजन योजनेची अंमलबजावणी करतांना विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर सकारात्मक परिणाम होतो.

04. मध्यान्ह भोजन योजना राबवितांना येणाऱ्या समस्यांचे पूर्तता करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीची भूमिका महत्वाची ठरते.

05. मुख्याध्यापकाला मध्यान्ह भोजन योजना राबवितांना समस्या निर्माण होतात.

06. मध्यान्ह भोजन योजना राबवितांना आपत्ती व्यवस्थापन सुविधा अंगीकारली जाते.

6) <u>संशोधन पध्दती :</u>

‘शालेय शिक्षणातील मध्यान्ह भोजन योजना प्रशासन व अंमलबजावणी एक चिकित्सक अभ्यास: विशेष संदर्भ लातूर जिल्हा’

प्रस्तुत संशोधनासाठी खालील संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येईल.

7) <u>माहिती संकलन :</u>

मध्यान्ह भोजन योजनेच्या अध्ययनासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोताचा वापर करण्यात येईल.

अ) प्राथमिक स्त्रोत :

निरीक्षण, प्रश्नावली व मुलाखत या साधनांचा वापर होईल.

ब) द्वितीय स्त्रोत :

मध्यान्ह भोजन योजनेचा सर्व अहवाल व शासनाचे परिपत्रक या साधनांचा उपयोग होईल.

8) **नमुना निवड :**

तालुका निहाय माहिती देण्यात येईल.

अ.क्र.	नाव	शाळा	मुख्याध्यापक	शिक्षक	मदतनीस	विद्यार्थी
1	लातूर	20	20	20	20	40
2	अहमदपूर	20	20	20	20	40
3	औसा	20	20	20	20	40
4	उदगीर	20	20	20	20	40
5	चाकूर	20	20	20	20	40
6	जळकोट	20	20	20	20	40
7	निलंगा	20	20	20	20	40
8	देवणी	20	20	20	20	40
9	शिरुर अनंतपाळ	20	20	20	20	40
10	रेणापूर	20	20	20	20	40
	एकूण	200	200	200	200	400

9) **माहितीचे विश्लेषण :**

मध्यान्ह भोजन योजनेच्या विश्लेषणासाठी संख्याशास्त्रीय तंत्राचा उपयोग करण्यात येईल. संशोधनाचे स्वरूप हे सामाजिक शास्त्रीय पध्दतीचे असेल या संशोधनात वर्णनात्मक व विश्लेषणात्मक अध्ययन पध्दतीचा वापर केला जाईल.

10) **संशोधनाची क्षेत्र मर्यादा :**

संशोधनकाचे संशोधन हे लातूर जिल्हा पुरतेच मर्यादीत आहे आणि याचा कालावधी 2017 ते 2020 इतकी आहे.

11) प्रकरणांची योजना :

1) प्रस्तावना :

प्रस्तुत विषयाअंतर्गत लातूर जिल्हा शिक्षणामध्ये उत्कृष्ट जिल्हा असल्यामुळे मी माझ्या संशोधन कार्यासाठी शालेय शिक्षणातील मध्यान्ह भोजन योजना प्रशासन व अंमलबजावणी एक चिकित्स अभ्यास : विशेष संदर्भ लातूर जिल्हा म्हणून निवडला आहे. लातूर जिल्ह्यात एकुण 10 तालुके आहेत. त्या सर्व तालुक्याचा माझ्या संशोधन कार्यात प्रस्ताविक स्वरूपात नमुना निवड पध्दतीद्वारे खालील तालुक्यांचा प्राथमिक शाळेतील मध्यान्ह भोजन योजनेचा संशोधन कार्यात आढावा घेणार आहे.1) लातूर 2) अहमदपूर 3) औसा 4) उदगीर 5) चाकूर 6) जळकोट 7) निलंगा 8)देवणी 9) शिरुर अनंतपाळ 10) रेणापूर इत्यसदी प्रस्ताविक स्वरूपात संशोधन कार्याचा आढावा घेणार आहे.

2) संशोधन साहित्याचा आढावा व संशोधन आराखडा :

प्रस्तुत संशोधन कार्याबद्दल सखोल माहिती मिळविण्यासाठी या संशोधन कार्याचा आढावा घेणे गरजेचे आहे. या समस्येचा अभ्यास करून संकल्पनेचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत आहे.

संशोधकाला संशोधन विषयाची त्या साहित्याचा आढावा घेणे व या संशोधनाला मार्गदर्शक म्हणून एक उत्तम दिशा मिळू शकते. म्हणून संशोधन साहित्याच्या आढावाची गरज घेणे आवश्यक वाटते.

संशोधन साहित्याच्या अभ्यासाचे महत्व स्पष्ट करीत असताना या संशोधन महत्वामध्ये किंवा साहित्यात पुस्तके, अहवाल, मासिके इ.समावेश होत असलेला दिसून येतो.

3) लातूर जिल्हा विशेष :

संशोधन कार्यासाठी लातूर जिल्ह्यातील एकूण 10 तालुकांचे संशोधन कार्य करण्यात येणार आहे. शिक्षणातील विशेष जिल्हा म्हणून आम्ही निवड केलेली आहे. या विविध तालुक्यातील प्राथमिक शाळेतील नमुना निवड पध्दतीने प्रत्येकी एका तालुक्यातील 20 शाळा, 20 मुख्याध्यापक, 20 शिक्षक व मदतीनस आणि 40 विद्यार्थी असे एकूण 120 संख्येचा संशोधन कार्ये स्वरूपात प्रत्येक तालुकांचा अशा पध्दतीने आढावा घेणार आहोत.

**4)	मध्यान्ह भोजन योजना प्रशासन आणि अंमलबजावणी :**

संशोधन कार्य म्हणजे संशोधन आराखडा तयार करणे होय. त्या संशोधन कार्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करीत असताना वर्गीकरण व विश्लेषण संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषण अर्थनिर्वाचन यामधून निष्कर्षप्रत जाणे होय.

मध्यान्ह भोजन योजना प्रशासन आणि अंमलबजावणी संशोधनासाठी माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावलीचा वापर प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी मदतनीस इ. कडून भेटी देवून माहिती संकलन करीता येते. मुख्याध्यापक शिक्षक शालेय पोषण आहार कर्मचारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीचे मध्यान्ह भोजन योजना प्रशासन व अंमलबजावणी यांचे विश्लेषण करून अर्थनिर्वाचन करण्यात येते.

**5)	माहिती संकलन माहितीचे विश्लेषण आणि अर्थ निर्वाचन :**

प्रस्तुत संशोधनात माहिती संकलन करण्यासाठी माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वाचन प्रश्नावलीच्या माध्यमातून शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी शालेय पोषण आहार मदतनीस इत्यादी माध्यमातून प्रश्नावलीच्याद्वारे माहिती संकलन करून त्याचे विश्लेषण व अर्थनिर्वाचन करता येते.

**6)	निष्कर्ष व शिफारशी :**

मागील माहितीच्या आधारे मिळवलेल्या संशोधनातून विश्लेषण व अर्थनिर्वाचन केलेले होते. मिळाविलेल्या प्रश्नावलीद्वारे माहितीचे विश्लेषण सारणी स्वरूपामध्ये अर्थनिर्वाचन देण्यात येते. प्रस्तुत संशोधनाचा संशोधनकाने निष्कर्ष व शिफारशी मांडाव्या लागतात. बौध्दीक विकासासोबतच शारिरीक, तंदुरूस्तपणा ही आवश्यक असून शालेय मध्यान्ह भोजन योजना प्रशासन व अंमलबजावणी करतांना येणाऱ्या समस्यांना मुख्याध्यापक, शिक्षक शालेय पोषण आहार मदतीनस यांना समोरे घेऊन समस्यांच्या अनुषंगाने संशोधन सारांश निष्कर्ष व शिफारशी प्रस्तुत करण्यात येतात.

संदर्भ ग्रंथाची सूची :

1) डॉ.दा.धो.काचोळे : सामाजिक संशोधन पध्दती, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद.

2) डॉ. बोरा / डॉ.शिरसाठ : लोक प्रशासनशास्त्र, विद्या बुक्स पब्लिकेशन ओरंगाबाद.

3) मध्यान्ह भोजन योजना संदर्शिका, बेसिक शिक्षा विभाग, उत्तर प्रदेश जुलाई-2006.

4) मध्यान्ह भोजन योजना, दिशा-निर्देश, प्रारंभिक शिक्षा विभाग, उत्तराखंड, देहराडून

5) मध्यान्ह भोजन योजना का प्राथमिक विद्यालय के विद्यार्थीयों की शैक्षीक उपलब्धी पर प्रभाव का अध्यान, डॉ.श्याम सिंह गैर, निलम सिंह.

6) मध्यान्ह भोजन योजना, का एक सूक्ष्मआयामी मूल्यांकन- (तहसी बीसलपूर, जिला पीलीगीत, उत्तर प्रदेश के विशेष संदर्भ, डॉ.मोहमंद इसरांर खान, राजकुमारी)

संशोधकाचे नाव

पार्वती दिगांबरराव वासरे

एम.ए. (लोकप्रशासन) बी.एड्,

एम. फिल

मार्गदर्शकाचे नाव

डॉ. संतराम प्रभाकर मुंडे

लोकप्रशासन विभाग प्रमुख

संजिवनी महाविद्यालय, चापोली

ता. चाकूर जि. लातूर